महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-२४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक:-तंशिस/शैवि/ परदेशी शिष्यवृत्ती /२०२४-२५/1889 दिनांक:- 20 MAY 2025

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित,खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय:- उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील " गुणवंत मुलामुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत **सन २०२५-२६ करिता** विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ:- १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.११८/ तांशि-४/ दि. ४/१०/२०१८
२) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण २०२०/ प्र.क्र.११६/ तांशि-४/ दि. ०६/०९/२०२१
३) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. बैठक २०२२/ प्र.क्र.१८८/ तांशि-४/ दि. ३१/०७/२०२३
४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. शिष्यवृ -२०२४/ प्र.क्र.२४३/ तांशि-४/ दि. ०६/०८/२०२४
मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /परदेशी शिष्यवृत्ती/ २०२५-२६/२८४/ दि.१९/०५/२०२४

संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील " गुणवंत मुलामुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता** Online पध्दतीने अर्ज मागविण्यांची प्रक्रिया संचालनालयाच्या **http://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरुन सुरू करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येत आहे की, सदर योजनेंची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या पर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून सदर **जाहिरात आपल्या संस्थेच्या दर्शनिय स्थळावर लावण्यात यावे.** तसेच सदर योजनेबाबतची माहिती आपल्या मार्फत **संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात** यावी. जेणे करून सदर शिष्यवृत्तीचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना घेणे सोईचे होईल.

सहपत्र:- (संदर्भिय पत्र क्र. ०१ संलग्न)

**( डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४२१
ई-मेल - foreignscholarship.desk18@dtemaharashtra.gov.in
वेबसाईट : https://dte.maharashtra.gov.in

## जाहिरातीचा मसुदा

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएच डी अशा अभ्यासक्रमासाठी, QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या करीता सदर योजनेतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा/अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहेत.

| अ. क्र. | शाखा/अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कला | ०३ | ०१ | ०४ |
| २ | वाणिज्य | ०३ | ०१ | ०४ |
| ३ | विज्ञान | ०३ | ०१ | ०४ |
| ४ | व्यवस्थापन | ०३ | ०१ | ०४ |
| ५ | विधी अभ्यासक्रम | ०३ | ०१ | ०४ |
| ६ | अभियांत्रिकी/वास्तूकला शास्त्र | १२ | ०४ | १६ |
| ७ | औषधनिर्माण शास्त्र | ०३ | ०१ | ०४ |
| | | ३० | १० | ४० |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत.**

१. उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
२. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवाराच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२५ मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.
३. उमेदवाराच्या पालकाचे/ कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२४-२५ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
४. या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुज्ञेय लाभ, निवड कार्यपध्दती, व या कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी माहितीकरीता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
५. इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पध्दतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| अ. क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | १९ मे २०२५ ते २५ जून २०२५ |
| २ | उमेदवारांनी खालीलप्रमाणे शाखा / अभ्यासक्रमनिहाय Online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतीसह विभागीय कार्यालयात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याची मुदत<br>१. कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे व उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण या ठिकाणी<br>२. व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तूकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या ठिकाणी | २० मे २०२५ ते २७ जून २०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |

उच्च शिक्षण विभागीय कार्यालये व तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाची पत्तानिहाय माहिती वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

Online अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने अर्ज केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्यानंतर सदर अर्जदारांना याबाबतची सर्व माहिती / सूचना उपरोक्त संकेतस्थळावरुनच देण्यात येतील त्यानुसार त्यांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

सही/-
(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

DGIPR/2025-2026/700